नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०६/२०२६ (रविवार)

## रामटेक शहरात पोलीसांचे ड्रोन पेट्रोलिंग
## नागरिकांमध्ये सुरक्षा व जनजागृतीचा संदेश

पोलीस स्टेशन रामटेक :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या नेतृत्वात दिनांक १३/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन रामटेकच्या वतीने रामटेक शहर परिसरात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत ड्रोन पेट्रोलिंग मोहीम राबविण्यात आली. तसेच नागरिकांमध्ये विविध मुद्दयांवर जनजागृती करण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करणे, गुन्हेगारीवर प्रतिबंध घालणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षा विषयक जनजागृती निर्माण करणे हा आहे.

ड्रोन पेट्रोलिंगमुळे विस्तृत क्षेत्रावर कमी वेळेत प्रभावीपणे नजर ठेवणे शक्य होत असून संशयास्पद हालचाली, गर्दीची ठिकाणे, संवेदनशील भाग तसेच गुन्हेगारीला पोषक ठरू शकणाऱ्या ठिकाणांवर सतत देखरेख ठेवता येते. यामुळे पोलिसांना तात्काळ माहिती मिळून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे सुलभ होते. तसेच नागरिकांमध्ये पोलीस उपस्थितीची जाणीव निर्माण होऊन गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा बसण्यास मदत होते.ड्रोन पेट्रोलिंगच्या माध्यमातून चोरी, घरफोडी, सार्वजनिक शांतता भंग करणारे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व वाहनचालकांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. शहरातील प्रमुख चौक, गर्दीची ठिकाणे, संवेदनशील भाग आणि गुन्हे घडण्याची शक्यता असलेल्या परिसरांवर ड्रोनच्या सहाय्याने प्रभावी देखरेख करण्यात येत असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरत आहे.

सदर ड्रोन पेट्रोलिंग दरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या काही वाहनचालकांची नोंद घेऊन त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात आली. तसेच नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.तसेच घरफोडी व चोरीच्या घटना टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत जनजागृती करण्यात आली. संशयास्पद व्यक्ती अथवा हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे नागरिकांना आवाहन करण्यात आले.



# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ४ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **१) जयराम तुकाराम सहारे, वय ६५ वर्ष, रा. कोंच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर आणि २) किशोर धनराज पिपरेवार, वय ३६ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपूर आणि आरोपी कं ३) अमोल चिंतामण पुडके, वय ३६ वर्ष, रा. कोंच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर ४) छत्रपाल शंकर पुरी, वय ५७ वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले.


सराईत गुन्हेगार नामे आरोपी **१) जयराम तुकाराम सहारे, वय ६५ वर्ष, रा. कोंच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर आणि २) किशोर धनराज पिपरेवार, वय ३६ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपूर आणि आरोपी कं ३) अमोल चिंतामण पुडके, वय ३६ वर्ष, रा. रा. कोंच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर ४) छत्रपाल शंकर पुरी, वय ५७ वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपूर** यांचेवर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **१) जयराम तुकाराम सहारे, वय ६५ वर्ष, रा. कोंच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर आणि २) किशोर धनराज पिपरेवार, वय ३६ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपूर यांना १ महीन्यांकरीता आणि आरोपी कं ३) अमोल चिंतामण पुडके, वय ३६ वर्ष, रा. रा. कोंच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर यास ०२ महीन्याकरीता ४) छत्रपाल शंकर**

पुरी, वय ५७ वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपूर यास ०१ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.



अमोल चिंतामण पुडके



किशोर धनराज पिपरेवार



जयराम तुकाराम सहारे



**छत्रपाल शंकर पुरी**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ३० लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १३/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, निलजकडुन भिवापूर मार्गे नागपूरकडे अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी वाडा ढाबा जवळ तास कॉलनी शिवार भिवापूर येथे नाकाबंदी केली असता संशयित टिप्पर (ट्रक) क्र. एम एच ४०/ सि टी ३३५४ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती (गौणखनिज) आढळुन आली. वाहन चालक श्रीराम बाबुराव राउत, वय ३२ वर्ष, रा. पाचगाव, ता. उमरेड, जि. नागपुर हा मिळुन आला. आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष टिप्पर (ट्रक) क्र. एम एच ४०/ सि टी ३३५४ किंमती ३०,००,०००/— रूपये आणि ०९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण किंमती**

३०,४५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी श्रीराम बाबुराव राउत, वय ३२ वर्ष, रा. पाचगाव, ता. उमरेड, जि. नागपुर याच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, ३ सार्वजनिक मालमत्ता दस्तऐवज अधिनियम, १५ पर्यावरण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १४/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती मिळाली की, पोस्टे कन्हान हद्दीतील पिपरी शिवारात एक इसम स्वत:जवळ धारदार शस्त्र बाळगुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले असता एक संशयित इसम मिळुन आला. पोलीसांनी त्याला नाव पत्ता विचारले असता त्याचे हिमांशू मुकेश महातो, वय २४ वर्ष, रा. पिंपरी कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांना पंचासमक्ष आरोपीची झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून **एक धारदार लोखंडी कोयता आणि एक लोखंडी धारदार टोक असलेला चाकू** मिळुन आला. सदर धारदार शस्त्रांच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) एक धारदार लोखंडी कोयता किंमती ५००/— रूपये, २) एक लोखंडी धारदार टोक असलेला चाकू किंमती ५००/— रूपये असा एकुण १,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपींविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.**



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. वाहनासह ६४ हजार २३० रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कोंढाळी :— दिनांक १४/०६/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, गजानन ले आउट येथील नितेश राउत यांच्या घराच्या बाजूला काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कोंढाळी पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) नितेश भिमराव राऊत, वय ३५ वर्ष, रा. गजानन ले आउट कोंढाळी, ता. काटोल २) पंकज प्रदीप माकोडे, वय २५ वर्ष, रा. रामनगर कोंढाळी, ता. काटोल ३) सिद्धार्थ विनोदराव भांगे, वय २५ वर्ष, रा. मटन मार्केट कोंढाळी, ता. काटोल ४) वसिम इब्राहीम मुसानी, वय ४२ वर्ष, रा. बुधवारपेठ कोंढाळी, ता. काटोल ५) अनिकेत सुर्यभान धोत्रे, वय २७ वर्ष, रा. पि.एच.सी रोड कोंढाळी, ता. काटोल यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ४२३०/—रूपये, ०१ मोपेड स्कुटी किंमती ६०,०००/—रूपये, असा एकुण ६४,२३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

## १० लाख ९१ हजार ५५० रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १३/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण १०,९१,५५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद येथे** १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे २ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ९०० मिली देशी दारू, ५४० लिटर मोहाफुल दारू, २३९०० लिटर मोहाफुल सडवा व ३४०० लिटर रसायन व इतर साहित्य असा एकुण १०,९१५५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने